(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९६१] १ एस. सी. आर. ४७४

**दि भोपाल शुगर इंडस्ट्रीज लिमिटेड.**

**- विरुद्ध -**

**दि इनकम-टॅक्स ऑफिसर, भोपाल**

(एस. के. दास, एम. हिदायतुल्ला, के. सी. दास गुप्ता, जे. सी. शाह आणि एन. राजगोपाल अय्यंगर, न्यायमूर्ती)

*वरिष्ठ न्यायाधिकरणांचे निदेश - जर त्यांचे पालन करण्यास नकार दिला जाऊ शकत असेल तर-न्यायदानाची तत्त्वे.*

आयकर अपीलीय न्यायाधिकरणाने आपल्या अपील अधिकारितेचा वापर करून, अपीलकर्त्याने त्यांच्या मळ्यात पिकवलेल्या व त्यांनी साखरेच्या निर्मितिसाठी वापरलेल्या ऊसाच्या बाजार मूल्याच्या निश्चिती संबंधी, उत्तरवादी, आयकर अधिकाऱ्याला काही विशिष्ट निदेश दिले. अपीलकर्त्याने आयकर अधिकाऱ्याकडे न्यायाधिकरणाचा सदर आदेश व निदेश अंमलात आणण्यासाठी याचना केली परंतु कोणताही अनुतोष दिला जाऊ शकत नाही असे त्यास कळविण्यात आले. याप्रकारे आयकर अधिकाऱ्याने न्यायाधिकरणाच्या निदेशांचे पालन केले नाही.

असा निर्णय देण्यात आला कि, वरिष्ठ न्यायाधिकरणाने आपल्या अपील अधिकारांचा वापर करून दिलेल्या निदेशांचे पालन न करणे हे परिणामतः न्याय नाकारणे होते आणि शिवाय ते न्यायालयाच्या अधिकारश्रेणी वरून या देशात जसे अधिष्ठित आहे त्याप्रमाणे, न्यायदानातील मूलभूत तत्त्वांपैकी एका तत्वाचे विनाशक होते, आणि अशा अपालनाचा परिणाम न्यायदानात गोंधळाची स्थिती निर्माण करेल.

दिवाणी अपीलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. ४०७/१९५६.

संकीर्ण दिवाणी प्रकरण क्र. २४/१९५५ मध्ये भूतपूर्व न्यायिक आयुक्त, भोपाल यांच्या न्यायालयाने दिनांक फेब्रुवारी १४, १९५६ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशा विरुद्ध अपील.

अपीलकर्त्या तर्फे सनत पी. मेहता आणि एस. एन. अँडले.

उत्तरवादी तर्फे के. एन. राजगोपाल शास्त्री आणि डी. गुप्ता.

२ सप्टेंबर १९६०. या न्यायालयाचा न्यायनिर्णय एस. के. दास न्यायमूर्ति यांनी दिला.

हे राज्यघटनेच्या अनुच्छेद १३३ नुसार प्रमाणपत्रावरून अपील आहे. निकाल देण्यासाठी अंतर्भूत असलेला संक्षिप्त प्रश्न असा आहे कि, आयकर अधिकारी, भोपाल, ह्यातील उत्तरवादी, द्वारे भोपाल शुगर इंडस्ट्रीस लिमिटेड, यात यापुढे अपीलकर्ता कंपनी असा निर्देश आहे, च्या विरुद्ध केलेला निर्धारण आदेशापासून अपीलकर्ता कपंनीने दाखल केलेल्या अपील मध्ये आयकर अपीलीय न्यायाधिकरणाने दिलेल्या काही निदेशांचे पालन कारणासाठी, ह्यातील उत्तरवादीस भाग पडण्याकरिता महादेश प्राधिलेखाच्या (Writ of Mandamus) स्वरूपात समुचित आदेश अथवा निदेश पारित करण्यासाठी प्रार्थना करणारी राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ खाली दाखल केलेली याचिका न्याय्य रीतीने खारीज केली का?

संबंधित तथ्ये अशी आहेत कि, अपीलकर्ता कंपनी विविध प्रतवारी आणि प्रमाणात साखरेची निर्मिती आणि विक्री करण्याचा व्यवसाय चालविते. त्यांचा सीहोर, जे पूर्वी भोपाल राज्यात होते आणि आता मध्य प्रदेश राज्यात स्थित आहे येथे स्वतःचा कारखाना आहे. त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी केला आणि त्या राज्यात असलेल्या मळ्यांमध्ये त्यांचा स्वतःचा ऊस जो साखरेच्या त्यांच्या निर्मितीसाठी वापरण्यात येतो, सुद्धा पिकवला. ३० सप्टेंबर , १९५० रोजी संपणाऱ्या खाते वर्षामध्ये, अपीलकर्ता कपंनीने त्यांच्या कारखान्यापासून सुमारे ८ ते २२ मैलाच्या अंतरावर स्थित १४ विभिन्न खरेदी केन्द्रांवरून, स्थानिक

शेतकऱ्यांकडून ७,७२,२१७ मण एवढा ऊस खरेदी केला. दिलेली खरेदी किंमत रू. १-४-६ प्रति मण होती, जी त्यावेळच्या भोपाल राज्याने निश्चित केलेली किंमत होती. विविध केंद्रांमधून कारखान्यात ऊस वाहून नेण्याचा सरासरी परिवहन खर्च रु. ०-४-९ प्रति मण असल्याबद्दलचे नमूद केले होते. ह्याच कालावधीमध्ये, अपीलकर्त्या कंपनीने ६,७८,४९० मण एवढा स्वतःचा ऊस पिकविला आणि ते ऊस शेतकऱ्यांच्या ऊसासह साखरेच्या निर्मितीसाठी त्यांच्या कारखान्यात आणला. त्यांच्या स्वतःच्या मळ्यात पिकवलेल्या ऊसासाठी, अपीलकर्त्या कंपनीने रू. १२,२९,७६३/- एवढे त्याचे बाजार मूल्य म्हणून रु. १-१३-० प्रति मण (सरासरी परिवहन खर्च म्हणून रू.०-४-९ सह), अशा प्रकारे ६,७८,४९० मणासाठी एकूण बाजार मूल्य येत आहे. अपीलकर्त्या कंपनीने पूर्वोक्त बाजारमूल्यातून रु.९,७७,७७२/- एवढी रक्कम कृषी परिव्यय, ते म्हणजे कापणीचा खर्च, भरणावळ, इत्यादी म्हणून कापून रू.२,५१,९९१/- एवढी शिल्लक कृषि-प्राप्ति म्हणून मागणी केली, जे कि निर्धारण वर्ष १९५१-५२ करीता त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या गणनेमधून वजा करण्यात आली. उत्तरवादीने रू. ९,७७,७७२/- हा आकडा कृषी परिव्यय म्हणून स्वीकारला, मात्र ६,७८,४९० मणाची अपीलकर्त्या कंपनीच्या स्वतःच्या मळ्यांमध्ये पिकविलेल्या उसाच्या बाजार मूल्याची गणना रू. १-६-० प्रति मण या दराने रू.९,३३,०००/- एवढी केली; अशा प्रकारे या गणनेनुसार रू. ४४,७७२/- चा तोटा होता आणि उत्तरवादीने आपल्या कर निर्धारण आदेशा मध्ये असा निर्णय दिला कि, अपीलकर्ता कंपनी निर्धारण वर्षाकरिता कृषी प्राप्तीची कोणतीही वजात ची मागणी करण्यास हक्कदार नाही.

अपीलकर्ता कंपनीने त्यानंतर अपिलीय सहाय्यक आयुक्त, जबलपूर यांच्याकडे अपील केली, ज्यांनी अपीलकर्ता कंपनीने स्वतःच्या शेतांमध्ये पिकविलेल्या उसाचे बाजार मूल्य रू.१-७-९ या दराने रू. १०,०७,१३२/- एवढे निर्धारित केले. परिणामी, कृषी उत्पन्न रू. २९,३६०/- एवढे झाले, जे अपीलकर्ता कंपनी च्या एकूण उत्पन्नातून वजा करण्यास अपिलीय सहाय्यक आयुक्त यांनी

अनुमती दिली.

अपिलीय सहाय्यक आयुक्तांच्या आदेशाने समाधान न झाल्याने, अपीलकर्त्या कंपनीने आयकर अपीलीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे अपील दाखल करून त्यांच्या मळ्यात पिकवलेल्या उसाचे बाजार मूल्य रु. १-७-९ प्रति मण च्या ऐवजी, रु. १-१३-० प्रति मण असावयास पाहिजे अशी हक्क मागणी केली. न्यायाधिकरणासमक्ष कृषी परीव्यवाबाबत कोणताही वाद नव्हता आणि न्यायाधिकरणाला ज्या प्रश्नावर निर्णय द्यावयाचा होता तो प्रश्न अपीलकर्त्या कंपनीच्या स्वतःच्या मळ्यात पिकवलेल्या ६,७८,४९० मण एवढ्या उसाच्या बाजार मूल्याशी संबंधित होता. आयकर नियमाचा नियम २३ आणि इतर काही बाबींचा संदर्भ पाहून, न्यायाधिकरणाने मत व्यक्त केले कि:

"त्यामुळे आमचा असा विचार करण्याकडे कल आहे की नियम २३ मध्ये दिलेल्या अर्थानुसार केंद्रे 'बाजार' नसून कारखाना हे 'बाजार' आहे जिथे निर्धारिती कंपनी साखरेची निर्मिती करते. हि बाजार मूल्य काढण्यासाठीची स्थिती असल्याने, आम्हाला केंद्रांपासून ते कारखान्यापर्यंतचा परिवहन खर्च जोडावा लागेल. आम्हाला सांगण्यात आले की परिवहन खर्च रु.०-४-९ प्रति मण एवढा आहे. आम्ही या आकड्याची पडताळणी करू शकलो नाही. त्यामुळे आमच्या मते, निर्धारिती कंपनीने स्वतःच्या मळ्यांमध्ये पिकविलेल्या उसाचे मूल्य रु. १-४-६ प्रति मण अधिक केंद्रांपासून ते कारखान्यापर्यंतचा प्रति मण सरासरी परिवहन खर्च, याप्रमाणे असावे."

त्यानंतर न्यायाधिकरणाने उत्तरवादीला खालील निदेश दिलेः

"त्यामुळे, आम्ही आयकर अधिकारी यांना असे आदेश देतो कि, केंद्रांपासून ते कारखान्यापर्यंतचे सरासरी परिवहन खर्च निश्चित करून त्यात रु.१-४-६ प्रति मण दराची भर घालून त्या आधारावर निर्धारिती कंपनीने स्वतःच्या मळ्यांमध्ये पिकवलेल्या उसाचे बाजार मूल्य काढावे. जर बाजार मूल्य रु.१-७-९ प्रति मण पेक्षा अधिक आले तर, आवश्यक मर्यादेपर्यंत आणखी अनुतोष

आयकर अधिकारी द्वारे देण्यात येईल. तथापि, बाजार मूल्य हे रू.१-७-९ पेक्षा कमी असल्यास, अपील निष्फळ झालीच पाहिजे."

आयकर आयुक्त यांनी त्यानंतर न्यायाधिकरणाकडे निदेशन साठी आयकर अधिनियम च्या कलम ६६(१) खाली अर्ज दाखल केला, ज्यात असे नमूद करण्यात आले कि, न्यायाधिकरणाच्या आदेशातून कायदाविषयक प्रश्न उद्भवला आहे, विभागाच्या मते, न्यायाधिकरणाने जितके उचित ठरवले नाही तितकेच, अपीलकर्ता कंपनीने पिकविलेल्या उसाच्या रू. १-४-६ प्रति मण या भावामध्ये सरासरी परिवहन खर्चचा भर घालून उचित केले नाही. मात्र, हा अर्ज ४ ऑगस्ट १९५४ रोजी मागे घेण्यात आला होता. अशा प्रकारे न्यायाधिकरणाचा आदेश अंतिम झाला आणि तो पक्षांना बंधनकारक होता. दरम्यान, अपीलकर्त्या कंपनीने न्यायाधिकरणाच्या निदेश अंमलातआणण्याकरीता उतरवादीकडे धाव घेतली. एका बाजूस उत्तरवादी आणि त्यांचे वरचे अधिकारी यांच्यामधील आणि दुसऱ्या बाजूस अपीलकर्ता कंपनी सोबतचे काही निषफळ पत्रव्यव्हारानंतर, उत्तरवादी यांनी अपीलकर्ता कंपनी ला २४ मार्च १९५५ रोजी कळविले कि, त्यांना कुठल्याच प्रकारचा दिलासा देण्यात येऊ शकत नाही. त्या तारखेच्या त्याच्या पत्रात उत्तरवादी म्हणाला कि:

" या संबंधात, मळ्यांमधून कारखान्यापर्यंत ऊस परिवहनाचा खर्च निश्चित करण्याच्या न्यायाधिकरणाच्या आदेशाकडे तुमचे लक्ष वेधले जाते, ज्याचा विचार केवळ कृषी उत्पादनांचे बाजार मूल्य ठरवताना केला जाऊ शकतो. तुमच्या वहीखातेवरून हे स्पष्ट होते की तुम्ही एकूण परिवहन खर्चापैकी रू. ५९,११६/- फक्त एवढी रक्कम तुमच्या कृषी उत्पन्न खात्यात जमा केल्याचे आढळून आले आहे. स्वाभाविकच, म्हणून, कृषी ऊसाचे बाजार मूल्य ठरविताना केवळ तुम्ही केलेला खर्च विचारात घेतला जाऊ शकतो. उसाचे मूल्यांकन करताना रू. १/४/६ या दराने ६,७८,४९० मण कृषी उत्पादनाच्या परिवहन खर्चाची भर घातल्याने, कृषी उत्पन्नाचे एकूण खर्च रु.९,२८,४३१/- एवढी होईल. याविरुद्ध अपीलीय

सहाय्यक आयुक्तांच्या आदेशानुसार शेतउसाचे मूल्य रु. १०,०७,१३२/- एवढे झाले असून अशा प्रकारे रू.७८,७०१/- एवढया रक्कमेचा, तुम्हाला आधीच मान्य करण्यात आली आहे. अशा प्रकारे कृषी उत्पादनांचे बाजार मूल्य कोणत्याही परिस्थितीत रु. १-७-९ पेक्षा अधिक नसल्याने, अपीलीय सहाय्यक आयुक्तांनी निर्णय दिल्याप्रमाणे न्यायाधिकरणाच्या आदेशाचा परिणाम म्हणून आदेशाच्या परिच्छेद ८ मध्ये दिलेल्या त्यांच्या निष्कर्षानुसार तुम्हाला कोणताही दिलासा दिला जात नाही."

उल्लेखनीय आहे की न्यायाधिकरणाने उत्तरवादीला केंद्रांपासून ते कारखान्यापर्यंतचे सरासरी परिवहन खर्च निश्चित करण्याचे निदेश दिले होते, तर उत्तरवादीने शेतांपासून ते कारखान्यापर्यंतच्या वाहतुकीच्या खर्चाचा संदर्भ दिला. स्पष्टपणे पुरेसे आहे की न्यायाधिकरणाच्या निदेशाचा चुकीचा अर्थ लावल्याने उत्तरवादी त्याचे पालन करण्यात अयशस्वी ठरला. न्यायाधिकरणाच्या निदेशाचे उल्लंघन करणाऱ्या एका आधारावर त्यांनी कारवाई केली.

या परिस्थितीत, अपीलकर्त्या कंपनीने, न्यायाधिकरणाने दिलेल्या निदेशांचे पालन करण्यास्तव उत्तरवादीला भाग पाडण्यासाठी रिट निर्गमित करण्यासाठी त्या क्षेत्रासाठी उच्च न्यायालयाच्या अधिकारांचा त्यावेळी वापर करणाऱ्या न्यायिक आयुक्त, भोपाल यांच्याकडे धाव घेतली. विद्वान न्यायिक आयुक्त यांना स्पष्ट शब्दात असे आढळले की उत्तरवादीने न्यायाधिकरणाने दिलेल्या निदेशांचे स्वछंदि आणि स्पष्टपणे उल्लंघन केले आहे; दुसऱ्या शब्दांत, त्यांना असे आढळले की उत्तरवादीने न्यायाधिकरणाच्या आदेशाचा अनादर केला असून कायद्यानुसार आपले कर्तव्य पार पाडण्यात ते अपयशी ठरले आहे व त्याने बेकायदेशीरपणे काम केले आहे. असे आढळून आल्यानंतर, विद्वान न्यायिक आयुक्त यांनी न्यायाधिकरणाच्या आदेशाचा अचूकपणा किंवा अन्यथा याची तपासणी केली आणि असे त्यास असे आढळले की न्यायाधिकरणाने केंद्रांना आयकर नियमाच्या नियम २३ च्या अर्थानुसार 'बाजारपेठ' म्हणून न मानण्यात चूक केली. त्यानंतर ते

या निष्कर्षावर पोहोचले की न्यायाधिकरणाने केलेली चूक लक्षात घेता, उत्तरवादीच्या आदेशामुळे कोणताही अभिव्यक्त अन्याय झालेला नाही; त्यानुसार, त्यांनी अपीलकर्ता कंपनीने रिट जारी करण्यासाठी केलेला अर्ज खारीज केला. आम्हाला असे वाटते की २४ मार्च १९५५ रोजी च्या पत्रात उत्तरवादीने दिलेल्या आदेशामुळे कोणताही अभिव्यक्त अन्याय झालेला नाही, असे मत विद्वान न्यायिक आयुक्त यांनी मांडणे हे स्पष्टपणे चुकीचे होते. त्या आदेशाद्वारे उत्तरवादीने दिलेल्या निर्धारण आदेशाच्या बाबतीत त्याच्या अपील अधिकारांचा वापर करून वरिष्ठ न्यायाधिकरणाने त्याला दिलेल्या निदेश अंमलात आणण्यास वस्तुतः अपालन केले. अशा प्रकारचे अपालन परिणामतः न्याय नाकारणे आहे आणि शिवाय ते न्यायालयाच्या अधिकारश्रेणी वरुन या देशात असे अधिष्ठित आहे त्याप्रमाणे न्यायदानातील मूलभूत तत्त्वांपैकी एका तत्वाचे विनाशक आहे.  जर एखाद्या कनिष्ठ न्यायाधिकरणाने आपल्या अपील अधिकारांचा वापर करून वरिष्ठ न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यास नकार दिला, तर परिणामतः न्यायादानात गोंधळ होईल आणि आम्हाला विद्वान न्यायिक आयुक्त यांनी  अवलंबविलेली  तर्क प्रक्रियेचे कौतुक करणे खरोखरच खूप कठीण वाटले आहे, ज्याद्वारे सर्वोच्च न्यायाधिकरणाच्या निदेश अंमलात आणण्यास नकार दिल्याबद्दल उत्तरवादीची पूर्णपणे निंदा केली, तरीही असे म्हटले की अशा नकारामुळे कोणताही उघड अन्याय झाला नाही. हे लक्षात ठेवले पाहिजे की २२ एप्रिल १९५४ रोजी च्या न्यायाधिकरणाचा आदेशाला न्यायिक आयुक्त यांच्या समक्ष आव्हान देण्यात आले नव्हते. तो आदेश पक्षांसाठी अंतिम आणि बंधनकारक झाला असून उत्तरवादी कोणत्याही प्रकारे त्यावर प्रश्न उपस्थित करू शकत नव्हता. वस्तुतः आयकर आयुक्त यांनी निदेशनासाठी अर्ज केला होता, जो अर्ज नंतर मागे घेण्यात आला. न्यायाधिकरणाने पारित आदेशांमधून उदभवणाऱ्या अपीली निकाली काढण्यास न्यायिक आयुक्त यांच्या समक्ष नव्हत्या आणि आम्हाला असे वाटत नाही की या प्रकरणाच्या परिस्थितीत त्यांच्याकरिता

न्यायधिकरणाचा आदेश चुकीचा आहे आणि म्हणून त्या आदेशाचा अनादर केल्याने कोणताच अन्याय झाला नाही असे म्हणण्याची मुभा त्याच्याकडे नव्हती. आम्ही यापूर्वी म्हटल्याप्रमाणे, असा दृष्टिकोन न्याय दानाच्या मूलभूत तत्त्वांपैकी एकाचा विनाशक आहे.

त्याच्याप्रति निष्पक्षता म्हणून असे नमूद करावयास हवे की उत्तरवादी तर्फे विद्वान अधिवक्ता यांनी वरिष्ठ न्यायाधिकरणाच्या निदेशांचे पालन करण्यास उत्तरवादीने दिलेल्या नकारातून कोणताही उघड अन्याय झाला नाही या कारणावर न्यायीक आयुक्त यांच्या न्यायनिर्णयाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी अनुमान्य केले कि, न्यायाधिकरणाचा आदेश जरी चुकीचा असला, तरी दुय्यम आणि कनिष्ठ न्यायाधिकरण त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही, तसेच कनिष्ठ न्यायाधिकरणाने वरिष्ठ न्यायाधिकरणाच्या निदेशांचे पालन केले पाहिजे या मूलभूत तत्त्वाचे पावित्र्य व महत्त्व तत्परतेने ओळखले. तथापि, त्यांनी असा युक्तिवाद केला, की न्यायाधिकरणाचा आदेश हा समजण्याजोगा नव्हता आणि उत्तरवादीने समजून घेण्याच्या त्याच्या कुवतेनुसार ते समजून घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. उत्तरवादीच्या वतीने केलेला हा युक्तिवाद आम्हाला काहीसा अप्रामाणिक वाटतो. न्यायाधिकरणाचा आदेश समजून घेण्यास आम्हाला कोणतीही अडचण दिसत नाही; न्यायाधिकरणाने उत्तरवादीला "केंद्रांपासून ते कारखान्यापर्यंतचे प्रति मण करीता सरासरी परिवहन खर्च निश्चित करून ते रू. १-४-६ प्रति मण उसाच्या भावामध्ये जोडण्याकरीत निदेश दिले होते." दिलेले निदेश स्पष्ट आणि असंदिग्ध आहे. उत्तरवादीने केंद्रांपासून ते कारखान्यापर्यंतच्या प्रति मण सरासरी परिवहन खर्च निश्चित करण्याएवजी, मळ्यांपासून ते कारखान्यापर्यंतच्या परिवहन खर्चाचा संदर्भ दिला आणि त्या आधारावर न्यायाधिकरणाच्या निदेशांचा अनादर केला; उत्तरवादीचे त्यानंतर असे म्हणणे कि, न्यायाधिकरणाचा आदेश समजण्याजोगा नव्हता हे प्रांजलपणाचा खेदजनक अभाव प्रकट करते. त्यामुळे, आम्हाला उत्तरवादीच्या वतीने विद्वान अधिवक्ता

यांनी केलेला युक्तिवाद फेटाळावयास हवे.

विद्वान न्यायिक आयुक्त यांनी महादेश प्राधिलेखाच्या (Writ of Mandamus) स्वरूपामधील एखाद्या निदेशाचा किंवा आदेशाची हक्क म्हणून हक्क मागणी करता येऊ  शकत नाही, तसेच प्रत्येक अकृती किंवा अनियमिततेकरिता रिट जारी करण्याची आवश्यकता नाही; अशा विधानाच्या पुष्ट्यर्थ बिमल चंद -विरुद्ध - चेअरमन, जियागंज अझीमगंज म्युनिसिपालिटी (१); ग्राम पंचायत, विदुल ऑफ विदुल -विरुद्ध - मल्टि पर्पस कॉ-ऑपेराटीव्ह सोसायटी ऑफ विदुल  (२) आणि  मेसर्स. सनईराम डुंगरमल -विरुद्ध - कमिशनर ऑफ इनकम टॅक्स (३) या तीन निर्णयांचा संदर्भ दिला. आम्ही व्यक्त केलेले मत म्हणजे, उत्तरवादी आक्षेपित आदेशाद्वारे, त्यांना नेमून  दिलेले कायदेशीर कर्तव्य पार पाडण्यात कसूर केली आणि अशी कसूर न्यायाच्या मूलभूत तत्त्वाचे नाश घडवून आणणारे होते, आयकर अपिलीय न्यायधिकरणाने त्यास दिलेल्या निदेशांचे पालन करण्यास उत्तरवादीला भाग पाडण्यासाठी न्यायानुसार (ex debito justiciae) महादेश प्राधिलेख (Writ of Mandamus) जारी कराव्यास हवे आणि वर नमूद केलेले निर्णय त्यांच्या पैकी निर्णयामध्ये वरिष्ठ न्यायाधिकरणाचा आदेश चुकीचा आहे या कारणामुळे, वरिष्ठ न्यायाधिकरणाने एकही संशयातीत अपिलीय अधिकारांचा वापर करून कनिष्ठ न्यायधिकरणाला दिलेले निदेश पालन करण्यास त्या न्यायाधिकाराने नकार देणे क्षमापित करण्याचा प्रश्न उदभवत नाही, असे केवळ नमूद करण्याच्या व्यतिरिक्त, विचारात घेणे अनावश्यक आहे.

त्यामुळे, आम्ही हे अपील अनुमत करून न्यायिक आयुक्त यांचा दि. १४ फेब्रुवारी १९५६ रोजीचा निर्णय आणि आदेश रद्द ठरवीतो आणि उत्तरवादीला आयकर अपील न्यायाधिकरण, मुंबई यांनी त्यांच्या दि. २२ एप्रिल १९५६ रोजीचा न्यायनिर्णयात व आदेशात दिलेल्या निदेशांचे पालन करण्यास निदेश देणारा आदेश पारित करतो. अपीलकर्ता कंपनी न्यायिक आयुक्तांसमोरील आणि या

न्यायालयासमोरील कार्यवाहीमध्ये आलेल्या त्यांच्या वाद खर्चासाठी हक्कदार असेल.

अपील अनुमत केले.

---------

[१] ए. आय. आर. १९५४ कॅल २८५.

[२] ए. आय. आर. १९५४ नाग. ८२

[३] ए. आय. आर. १९५५ आसाम २०१.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल."